श्री तुळजा भवानी मंदीर संस्थान संचलीत
# श्री तुळजा भवानी अभियांत्रिकी महाविद्यालय,
# तुळजापूर 413601 जि. उस्मानाबाद
Ph No. 02471 243603. Email- stbcet@gmail.com Web – www.stbcet.org.in

ज.क्र./श्री तुभअम/भांडारविभाग /2019/

दिनांक – 01/11/2019

प्रती,

____________________________

____________________________

विषय – श्री तुळजा भवानी अभियांत्रिकी महाविद्यालयातील निकामी रद्दी विक्रीसाठी सिलबंद दरपत्रक सादर करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी श्री तुळजा भवानी अभियांत्रिकी महाविद्यालयातील निकामी रद्दी विक्रीस काढण्यात येत आहे. तरी खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सिलबंद दरपत्रक सादर करावे.

विहीत दरपत्रकाचा नमुना महाविद्यालयाच्या सुचना फलकावर व तसेच महाविद्यालयाच्या वेब साईट वर www.stbcet.org.in दिनांक.– 01/11/2019 ते दिनांक. 06/11/2019 पर्यंत प्रसिध्द करण्यात येत आहे. **दरपत्रक स्वींकारणे अंतीम दिनांक – 07/11/2019 रोजी कार्यालयींन वेळेपर्यंत यानंतर आलेले दरपत्रक स्वींकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.** प्राप्त दरपत्रके दिनांक 08/11/2019 रोजी मा. प्राचार्य यांच्या कक्षात दुपारी 03.00 वाजता उघडण्यात येतील.

## दरपत्रकाच्या अटी व शर्ती

1. दरपत्रकासोबत खालील कागदपत्राच्या झेरॉक्स / छायांकीत सत्य प्रती जोडणे आवश्यक आहे.

   अ) शॅाप अॅक्ट लायसन्स (भंगार साहित्य खरेदी व विक्री लायसन्स) व सदर दाखला (लायसन्स) नुतनीकरण केलेला असणे आवश्यक आहे.

   ब) पॅन कार्ड, आधार कार्ड छायांकीत सत्य प्रती

   क) दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र सही व शिक्क्यासह स्वतःच्या लेटरहेड वर

2. निकामी रद्दी वजन करण्यासाठी वजन काटा, मनुष्यबळ व इतर आवश्यक बाबी दरपत्रकधारकाकडे असणे आवश्यक आहे. सदर किरकोळ भंगार साहित्याचे वजन समितीच्या समोर करण्यात येईल.

Scanned by CamScanner

3. महाविद्यालयातील निकामी रद्दी विक्री झालेल्या साहित्याची वाहतुक स्वखर्चाने करावी लागेल.

4. महाविद्यालयातील निकामी रद्दी वजन झाल्यावर त्याच दिवशी साहित्याचे स्थलांतर करण्यापुर्वी सदरील साहित्याची देय रक्कम रोखीने महाविद्यालयास अदा करावी लागेल.

5. दरपत्रकधारकाने स्वतःच्या अटी घालुन दरपत्रक भरल्यास असे कोणतेच दरपत्रक ग्राहय धरले जाणार नाही.

6. निकामी रद्दी विक्री मधील एखादया वस्तुस योग्य किंमत न आल्यास भंगार वस्तु विकणे अथवा न विकणे / स्थगीत ठेवणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीताकडे राखुन ठेवणेत आला आहे.

7. या दरपत्रका संदर्भात कांही वाद निर्माण झाल्यास ते प्रकरण केवळ तुळजापूर येथील तालुका कोर्टातच चालविले जाईल.

8. वरिल दरपत्रक अटी व शर्तीमध्ये बदल करणे, दुरुस्ती करणे, एक किंवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारणे /स्थगीत ठेवणे अथवा रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांकडे राखुन ठेवला आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयातील निकामी रद्दी | अंदाजे वजन | किंमत अंकात एकुण | दर प्रती किलो अक्षरी |
|---|---|---|---|---|
| 01 | निकामी रद्दी सर्व प्रकारची | 1000 Kg | | |

1.11.19

प्राचार्य

श्री.तु.भ.अभि. महाविद्यालय, तुळजापूर

Scanned by CamScanner